# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:13.04.2026** **वार: सोमवार**

---

1. ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं मुंबईत निधन; आज दुपारी शासकीय इतमामात होणार अंत्यसंस्कार
2. आशाताईंच्या निधनाबद्दल देशभरातून शोकभावना; मान्यवरांनी वाहिली आदरांजली
3. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत नारी शक्ती वंदन संमेलनाला संबोधित करणार आणि
4. गारे पालमा कोळसा खाण प्रकल्प राज्याच्या ऊर्जा सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन

**आशा भोसले-निधन**

प्रख्यात अष्टपैलू गायिका आशा भोसले यांचं काल मुंबईतील रुग्णालयात निधन झालं. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना शनिवारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्या 92 वर्षांच्या होत्या. आशा भोसले यांचं पार्थिव लोअर परळ इथल्या त्यांच्या निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं असून आज संध्याकाळी चारच्या सुमारास शिवाजी पार्क स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. जवळपास आठ दशकांच्या त्यांच्या संगीत क्षेत्रातील कारकिर्दीचा हा आढावा...

**आठ सप्टेंबर 1933 रोजी सांगली इथं मंगेशकर कुटुंबात जन्मलेल्या आशा भोसले यांना त्यांच्या अन्य भावंडांप्रमाणेच सुरांच्या वारशाबरोबरच संगीत प्रतिभेचं वरदान लाभलं होतं. वयाच्या 10व्या वर्षी 1943 मध्ये माझा बाळ या चित्रपटातील गाणं गाऊन गायनक्षेत्रात पदार्पण केलेल्या आशा भोसले यांची वयाच्या नव्वदीतही संगीताची सेवा सुरूच होती. वयाची 90 वर्षं पूर्ण केल्यानंतर मंचावरून तीन तासांचा लाईव्ह कार्यक्रम अत्यंत उत्साहात सादर करणाऱ्या आशा भोसले या बहुदा जगातील एकमेव गायिका असाव्यात. चित्रपटसृष्टीत तसंच रसिकांमध्ये त्यांना प्रेमानं आशाताई म्हणून संबोधलं जातं. आशाताईंच्या वागण्या-बोलण्यात असलेला दिलखुलासपणामुळे रसिकांना त्यांच्याबद्दल जिव्हाळा वाटत असे. त्यांचा खळाळता उत्साह, मोकळेपणा, ताजेपणा त्यांच्या गाण्यांमधून डोकावत असे. अच्छा जी मै हारी चलो मान जाओ ना म्हणत प्रियकराची खट्याळपणे समजूत घालताना असो की मेरे दो नयन चोर नहीं सजन तुमसेही खोया होगा कही तुम्हारा मन म्हणताना असो त्याचवेळी का रे दुरावा, का रे अबोला मधून व्यक्त केलेली आर्जवं असोत आशाताईंनी गायलेल्या सर्व ढंगाच्या गाण्यांना रसिकांची भरभरून दाद मिळाली आहे. आशाताईंनी अनेक जुन्या नव्या संगीतकारांची अक्षरशः हजारो गाणी गायली. तरीपण विशेषतः मराठीत सुधीर फडके-श्रीधर फडके या संगीतकार पितापुत्रांची हिंदीत ओपी नय्यर आणि नंतर राहुलदेव देव बर्मन या संगीतकारांशी त्यांचे जास्त सूर जुळले. साक्षात सरस्वतीचा वरदहस्त ज्यांना लाभला होता असं म्हटलं जातं त्या गानसम्राज्ञी लता मंगेशकर सिनेसंगीत विश्वाच्या सम्राज्ञी अधिराज्य करत असताना आशा भोसले यांनीही आपला ठसा उमटवत संगीत रसिकांच्या मनात त्यांच्या बरोबरीचं स्थान प्राप्त केलं होतं. आपले वडील मास्टर दीनानाथ यांची प्रसिद्ध नाट्यगीतं असोत की बुगडी माझी सांडली गं सारखा लावणीतला ठसका असो. भक्तिगीतांमधला प्रासादिक भाव असोत की विविध भावना व्यक्त करणारी भावगीतं, दम मारो दम, पिया तू अब तो आजासारखी पाश्चात्य धाटणीची गीतं असोत की इना मिना डिका सारखी उडत्या चालीच्या गाण्यांपासून अगदी अलीकडच्या काळातील आयटम साँगपर्यंत आशाताईंनी कुठलीच गाणी वर्ज्य मानली नाहीत. त्यांची अशी एकापेक्षा एक सरस गाणी ऐकत देशातल्या कितीतरी पिढ्या लहानाच्या मोठ्या झाल्या. त्यांचं नाच रे मोरा गाणं माहिती नाही अशी आता हयात असलेल्या पिढीतली एकही व्यक्ती आढळणार नाही, अगदी 21 व्या शतकात जन्मलेले जेन झीही त्याला अपवाद नसतील. फुलले रे क्षण माझे मधली नववधूच्या मनातली भावना असो की मलमली तारुण्य माझे मधला श्रृंगार आशाताईंनी सारख्याच ताकदीनं आपल्या गाण्यातून रसिकांपर्यंत पोहोचवली. आशाताईंच्या मराठी, हिंदी गाण्यांच्या खजिन्यातील कुठलं गाणं जास्त अमूल्य आहे हे ठरवणं खरोखरच महाकठीण आहे. आशाताईंनी तामिळ, बंगाली, मल्याळम, भोजपुरी सारख्या अनेक भारतीय भाषांमधलीच नव्हे तर रशियन, नेपाळी, मलय यांसारख्या परदेशी भाषांतील गाणीही गायली आहेत. काही वर्षांपूर्वी त्यांनी माजी ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू ब्रेट ली बरोबरही इंग्रजी अल्बम केला होता. प्रसिद्धीची अनेक उत्तुंग शिखरं गाठत असताना व्यक्तिगत जीवनात संघर्ष, दुःखद**

प्रसंग ओढवूनही त्यांच्या संगीत सेवेत कधीही खंड पडला नाही, आशादायी स्वरांतून कधीही निराशेचा सूर आळवला गेला नाही त्यांच्या स्वरांचा खळाळता झरा अखेरच्या श्वासापर्यंत वाहतच राहिला..... आणि यापुढेही त्यांची सुमधुर गीतं रसिकांच्या मनात कायम रेंगाळत राहतील.

आशाताईंच्या या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांना अनेक प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी गौरवण्यात आलं. भारत सरकारनं त्यांना पद्मविभूषण हा सर्वोच्च पुरस्कार देऊन सन्मानित केलं होतं, तर सन दोन हजार मध्ये त्यांना भारतीय चित्रपटसृष्टीतल्या दादासाहेब फाळके या सर्वोच्च पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं. महाराष्ट्र सरकारनं त्यांना महाराष्ट्र भूषण देऊन गौरवलं होतं. त्यांना राष्ट्रीय पुरस्कारांसोबत अनेक मानाचे पुरस्कार मिळाले आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या ग्रॅमी पुरस्कारासाठीही त्यांना नामांकन मिळालं होतं. अशा या अष्टपैलू गायिकेला भावपूर्ण श्रद्धांजली.

**आशा भोसले-निधन प्रतिक्रिया**

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या जाण्यानं संगीत क्षेत्रातील एक सुवर्णयुग संपल्याची भावना देशभरातून व्यक्त होत आहे. विविध मान्यवरांनी आशा भोसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन्, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आशा भोसले यांच्या निधनाबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे.

केंद्रीय मंत्रीमंडळातील अनेक सदस्यांनी, कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासह अनेकांनी आशाताईंच्या योगदानाचं स्मरण करत त्यांच्या संगीत वारशाला अभिवादन केलं आहे.

राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनीही आपल्या शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

मुख्यमंत्र्यांनी काल आशा भोसले यांच्या पार्थिवाचं दर्शन घेऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. अखेरच्या श्वासापर्यंत संगीताची सेवा करणाऱ्या आशाताईंच्या निधनानं सुरांची सुंदर बाग आज उजाड झाली, अशी भावना फडणवीस यांनी व्यक्त केली.

**पंतप्रधान-नारीशक्ती**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत 'नारी शक्ती वंदन संमेलनाला संबोधित करणार आहेत. देशाच्या विकासाची दिशा ठरवण्यात महिलांचा सहभाग अधिक वाढवण्याची कटिबद्धता अधिक बळकट करण्यासाठी या राष्ट्रीय स्तरावरील संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांना अधिक प्रतिनिधित्व मिळण्याचं महत्त्वही या कार्यक्रमाद्वारे अधोरेखित होणार आहे.

महिला आरक्षणाला गती देणाऱ्या विधेयकवर चर्चा करून ते संमत करण्यासाठी, या महिन्याच्या 16 तारखेपासून संसदेचे विशेष अधिवेशन होणार आहे.

**गारे पालमा कोळसा खाण**

राज्यातील ऊर्जा सुरक्षितेसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या उच्च दर्जाच्या कोळसा खाणीमुळे कोळशाचं अवलंबित्व कमी होणार आहे, तसंच पर्यावरणाच्या संवर्धनाबरोबरच विजेचे दर कमी होऊन भविष्यातील ऊर्जेची गरज पूर्ण होणार आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. महानिर्मितीच्या छत्तीसगड राज्यातील गारे पालमा कोळसा खाणीतून नागपूर जिल्ह्यातील कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात येणाऱ्या पहिल्या कोळसा रेल्वे रॅकला फडणवीस यांनी हिरवा झेंडा दाखवला; त्यावेळी ते बोलत होते.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. गारे पालमा या कोळसा खाणीतून अत्यंत उच्च दर्जाचा कोळसा उपलब्ध होत असल्यामुळे ऊर्जा निर्मितीची क्षमता वाढणार आहे, त्यामुळे राज्यात भार नियमन राहणार नाही, तसंच शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करणे सुलभ होईल असं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

**हवामान**

राज्यात अनेक ठिकाणी कमाल तापमानात वाढ झाली आहे. मध्य महाराष्ट्रात आज उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. राज्यात काल सर्वात जास्त तापमान अकोला इथं 42 अंश नोंदवलं गेलं.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.